क्र.एम.ए.जी/वशि/ ०१/११
उपविभागीय अधिकारी कार्यालय
करवीर विभाग कोल्हापूर
दिनांक :- ४/२/२०११

१) श्री.उदय धेंयशिल गायकवाड
रा. श्वेता अपार्टमेंट , ताराबाई पार्क , कोल्हापूर
२) श्री. विजय शामराव देवणे
रा. २३७१ बी देवणे गल्ली , मंगळवार पेठ, कोल्हापूर
३) श्री. दिलीप अशोक देसाई
रा.ए-२२ सरगम विहार अपार्टमेंट
नागाळा पार्क, कोल्हापूर
} अर्जदार

विरुध्द

१) मा.श्री. ए.ए.देशपांडे
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
उद्योग भवन ००, कोल्हापूर
२) मा.श्री. ए.बी.दुर्गुळे
उपप्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
उद्योग भवन ००, कोल्हापूर
३) मा.श्री.डी.आर.मोरे
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, सिंचन भवन
ताराबाई पार्क, कोल्हापूर
४) मा.श्री.बा.म.कुंभार
उपविभागीय अभियंता,
पाटबंधारे विभाग, सिंचन भवन
ताराबाई पार्क, कोल्हापूर
} प्रतिवादी

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ( सन १९७४ इचा अधिनियम क्र.२) यातील कलम १३३(१)(ख) अन्वये कारणे दाखवा नोटीस**

ज्याअर्थी आपणास या नोटीसीव्दारे कळविणेत येते की, श्री.उदय गायकवाड व २ यांनी आपले विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ ( सन १९७४ इचा अधिनियम क्र.२) यातील कलम १३३ खाली अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उक्त कायदयाचे कलम १३३ अन्वये दाखल झालेल्या प्रस्तावामध्ये सुनावणीची तारीख दिनांक ११/०२/२०११ रोजी ठिक सकाळी ११-०० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय करवीर विभाग कोल्हापूर येथे नेमणेत आली आहे. त्यामध्ये आपली बाजू मांडणेकामी आपण अथवा आपल्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत पुराव्याचे कागदपत्रासह उपस्थित रहावे. सोबत अर्जाची प्रत जोडली आहे.

उपविभागीय दंडाधिकारी
करवीर विभाग कोल्हापूर




## मा. उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग करवीर.

## यांचे कोर्टात...

१) श्री. उदय धैर्यशील गायकवाड
व.व. ४४, धंदा–व्यवसाय,
रा. श्वेता अपार्टमेंट, ताराबाई पार्क, कोल्हापूर.
२) श्री. दिलीप अशोक देसाई
व.व. ४३, धंदा–व्यवसाय,
रा. ए–२२ सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

वादी

*विरूध्द*

१) मा. श्री. ए. ए. देशपांडे,
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
उद्योग भवन, कोल्हापूर.
२) मा. श्री. ए. बी. दुर्गुळे
उपप्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
उद्योग भवन, कोल्हापूर.
३) मा. श्री. डी. आर. मोरे
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, सिंचन भवन,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.
४) मा. श्री. बा. म. कुंभार
उपविभागीय अभियंता,
पाटबंधारे विभाग, सिंचन भवन,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.

प्रतिवादी

**क्रिमीनल प्रोसीजर कोड ( सी.आर.पी.सी )**
**कलम १३३ नुसार कारवाईबाबत.**

**यातील फिर्यादीचे मे. कोर्टास नम्रपणे कळविणे की, –**

पंचगंगा प्रदुषणाचा प्रश्न खो–यामध्ये गंभीर झाला असून परिणामी शहरातील दोन लोकांचा मृत्यू झाला. याबाबतचे वृत्त स्थानिक दैनिकांमध्ये प्रसिध्द झाले आहे त्याचबरोबर सध्या शहरात शेकडो लोक कावीळ, गॅस्ट्रो सारख्या साथीच्या रोगाने ग्रस्त आहेत.

नदीच्या प्रदुषणास कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी नगरपालिका खो–यातील १७४ ग्रामपंचायती, जिल्हा परिषद, साखर कारखाने औद्योगिक वसाहतीमधील उद्योग, वैद्यकीय व्यावसायीक, सी.पी. आर. हॉस्पीटल, कत्तलखाने, सर्व्हिसिंग स्टेशन आदी घटक जबाबदार आहेत ही बाब प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रसिध्द केलेली फेब्रुवारी २००६ मधील श्वेतपत्रिका तसेच २००९ मधील जिल्हाधिकारी यांचा खो–यातील प्रदुषणाचा अहवाल यावरून स्पष्ट होते.

सदर अहवाल आणि प्रत्यक्ष स्थितीस अनुसरून पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व जलप्रदुषण कायदा १९७४ अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्यामार्फत कारवाई करणे निश्चित आहे. सदर कायदेशीर कर्तव्य मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. अजित देशपांडे व उपप्रादेशिक अधिकारी श्री. अमर दुर्गुळे यांचे आहे संबंधीत घटकांवर कारवाई व नियंत्रणाची जबाबदारी असुनही त्यांनी कायद्याची अंमलबजावणी केली नाही.

तसेच पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. डी. आर. मोरे, उपअभियंता कुंभार यांनी जलप्रदुषण कायदा १९७४ व पाटबंधारे कायदा १९९६ आणि पाणी पुरवठा करारातील अटीनुसार प्रदुषण करणा–या संबंधीतांवर कारवाई करणे आवश्यक होते.

याबाबत यापूर्वी आपल्या अंतरीम आदेशाची अंमलबजावणी करून घेणेत प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक व उपप्रादेशिक अधिका–यांनी देखील कसूर केली आहे.

सबब, लोकांना झालेला स्वास्थ व आरोग्य विषयक त्रास, रोगराई, मृत्यू आणि पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करून न दिल्यामुळे संविधानातील जगण्याच्या हक्कास बाधा पोचविणे व मानवी मृत्यूस जबाबदार धरून सी. आर.पी.सी. कलम १३३ नुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. अजित देशपांडे, उपप्रादेशिक अधिकारी श्री. अमर दुर्गळे, पाटबंधारे विभागाचे श्री. डी. आर. मोरे, उपअभियंता श्री. कुंभार आदी चार अधिका–यावर कारवाई करणेत यावी.

मा. नाम. हसन मुश्रीफ यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दि. ३१/१/२०११ रोजी बैठक घेऊन याबाबत संबंधीतांवर कारवाई करावी असे आदेश दिले. यावरून विषयांचे गांभीर्य स्पष्ट होते हे लक्षात घेऊन सदर अर्जातील कारवाई त्वरीत करणेकामी नोटीसा बजावणेत याव्यात व संबंधीत प्रदुषण करणा–या घटकांवर तात्काळ कारवाई करणेत यावी ही विनंती.

कोल्हापूर.

ता. ३/२/२०११

१)

२)

वादी

# मा.उपविभागीय अधिकारी, करवीर विभाग कोल्हापूर करवीर यांचे कोर्टात

**श्री उदय धैर्यशील गायकवाड व एक** **... वादी**

**विरुध्द**

**श्री ए.ए.देशपांडे,**

**प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**कोल्हापूर आणि इतर ३** **... प्रतिवादी**

वादी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम १३३ (१) (ख) नुसार केलेल्या अर्जास प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमार्फत लेखी निवेदन

**कृपया सादर**

प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे वरील प्रकरणामध्ये लेखी निवेदन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याविरुध्द श्रीयुत उदय धैर्यशील गायकवाड, श्री विजय शामराव देवणे आणि श्रभ हर्षल अशोक सुर्वे यांनी यापूर्वी अर्ज क्र.१/२००९ मध्ये कलम १३३, फौजदारी दंडप्रक्रिया संहिता, १९७३ नुसार अर्ज सादर केलेला होता आणि त्यामध्ये कोल्हापूर रहिवासीय यांच्यावर निर्माण झालेला महत्वाचा धोका प्रतिबंध करण्याकरिता, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य ते आदेश कलम १३३ प्रमाणे जारी करण्याबाबत प्रार्थना करण्यात आली होती.

सदरहू अर्जास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे तत्कालीन प्रभारी प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कोल्हापूर यांनी दिनांक २४/३/२००९ रोजी तपशीलवार उत्तर सादर केलेले होते.

सदरहू उत्तरातील वस्तुनिष्ठ परिस्थिती आणि कायदेशीर तरतुदी विचारात घेऊन, त्यावेळी तत्कालीन उप-विभागीय दंडाधिकारी, करवीर विभाग, कोल्हापूर यांनी त्या अर्जातील तत्कालीन प्रतिवादी नं.१ म्हणजेच तत्कालीन आयुक्त कोल्हापूर



महानगरपालिका यांनी कलम १३३, फौजदारी दंडप्रक्रिया संहिता, १९७३ प्रमाणे दिलेल्या आदेशाची पूर्तता न झाल्यास, कलम १३३ प्रमाणे अंतीम आदेश कोल्हापूर महानगरपालिका यांच्याविरुध्द निर्गमित करण्यात येतील, असे स्पष्ट आदेश दिलेले होते. त्यानंतर तत्कालीन प्रादेशिक अधिकारी, मप्रनि, कोल्हापूर यांनी दिनांक १९/५/२००९ च्या पत्राद्वारे सदरहू अर्जातील प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी दिलेल्या आदेशांची पूर्तता न केल्याबाबतचा अहवाल आपल्या कार्यालयाकडे सादर केलेला होता.

सोबत आपण दिलेले पत्र, तत्कालीन प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कोल्हापूर यांनी दिलेले उत्तर आणि अपूर्तता अहवाल यांच्या प्रती **जोडपत्र-अ, ब आणि क** प्रमाणे जोडण्यात येत आहेत.

२. आंपण दिनांक ४/२/२०११ च्या पत्राद्वारे प्रादेशिक अधिकारी आणि उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कोल्हापूर यांना, फौजदारी दंडप्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम १३३(१) (ख) अन्वये नुकतीच कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्यामध्ये असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, ज्याअर्थी श्रीयुत उदय गायकवाड आणि इतर यांनी मप्रनि मंडळ आणि इतरांविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम १३३ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे, त्याअर्थी मप्रनि मंडळाची बाजू मांडणेकरिता स्वत: किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत पुराव्याचे कागदपत्रासह दिनांक ११/२/२०११ रोजी सकाळी ११ वाजता उपस्थित रहावे असे कळविलेले होते. सदरहू तारखेस मप्रनि मंडळातर्फे दिनांक ९/२/२०११ च्या पत्राद्वारे खुलासा सादर करण्याकरिता १५ दिवसांची मुदत मागण्यात आलेली होती. मात्र, अशी मुदत न देता, सदरहू अर्जाची सुनावणी दिनांक १४/२/२०११ रोजी ठेवण्यात आलेली होती.

सदरहू सुनावणीच्या वेळी, मप्रनि मंडळातर्फे श्रीयुत दिलीप देसाई, अनुरेखक, प्रादेशिक कार्यालय-कोल्हापूर हे प्रतिनिधी उपस्थित असता, त्यांना कळविण्यात आले की, पुढील सुनावणीची तारीख १८/२/२०११ अशी नेमलेली आहे. सदरील दिवशी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी म्हणणे सादर केले नाही तर, अंतरीम /अंतीम आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे स्पष्ट करण्यात येते की, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० नुसार सर्व संबंधीतांच्या जबाबदा-या निश्चित केलेल्या असून, त्यामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची जबाबदारी अत्यंत मर्यादीत अशी असून, ती पर्यावरण (संरक्षण) अधिनियम व नियम यामध्ये देण्यात आलेल्या मानकांची पूर्तता होते किंवा नाही? याकरिता जमीनीतील पाणी, वातावरणातील हवा, लिचेट आणि  तयार होणा-या मिश्र खताची गुणवत्ता तपासणे आणि पाहणी करणे, सदरहू नियमाप्रमाणे सशर्त अधिकारपत्र देणे इतकीच मर्यादीत आहे.

सदरहू नियमाप्रमाणे राज्य शासन म्हणून महानगरांमध्ये नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सचिवांमार्फत आणि इतर जिल्ह्यामध्ये संबंधीत दंडाधिकारी यांच्यामार्फत योग्य ती अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट केलेले आहे. सदरहू नियमांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेवर त्यांच्या क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन करण्याची संपूर्ण जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. तसेच, सदरहू स्थानिक स्वराज्य संस्थांनी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांकडून योग्य ते अधिकारपत्र घेऊन, नियमामध्ये दिलेल्या परिशिष्ठाप्रमाणे दिलेल्या विहित वेळेमध्ये योग्य ती मानके प्राप्त करुन, नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी करावी, अशी स्पष्ट जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. सदरहू नियमांची पूर्तता करण्याकरिता देण्यात आलेला कालावधी ३१/१२/२००३ रोजी संपलेला असून, त्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेने जरी नागरी घनकचरा व्यवस्थापन केंद्र कसबा बावडा येथे खाजगी उद्योजकामार्फत उभारलेले असले तरीसुध्दा त्याठिकाणी योग्य ती शास्त्रोक्त भूभरण व्यवस्था उभारलेली नसल्यामुळे, पर्यावरणाचे गंभीर प्रश्न निर्माण झ ालेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे कोल्हापूर येथील पंचगंगा नदीच्या प्रदूषणाबाबत मप्रनि मंडळाने यापूर्वीच एक श्वेतपत्रिका फेब्रुवारी २००६ मध्ये प्रसिध्द केलेली असून, कोल्हापूर शहरासाठी योग्य तो कृती आराखडा देखील तयार केलेला आहे. सदरहू श्वेतपत्रिकेमध्ये, मंडळातर्फे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण ) अधिनियम १९७४ आणि पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ नुसार, मप्रनि मंडळाने योग्य त्या सर्व कायदेशील कारवाया केलेल्या असून, कोल्हापूर महानगरपालिकेने सदरहू कायदेशीर कारवाईप्रमाणे योग्य तो प्रतिसाद न दिल्यामुळे, कोल्हापूर महानगरपालिकेमधून निर्माण होणारा घनकचरा आणि सांडपाणी यामुळे अतिशय गंभीर असे पर्यावरण प्रदूषणाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत.

अशा परिस्थितीमध्ये, दोन पेक्षा जास्त फौजदारी स्वरुपाचे खटले दाखल करुन, वेळोवेळी अनेक आदेश कोल्हापूर महानगरपालिकेस देण्यात आलेले आहेत. सोबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी केलेल्या कायदेशीर कारवाईचा तपशील **जोडपत्र-ड** प्रमाणे जोडण्यात येत आहे. त्यामध्ये केवळ कोल्हापूर महानगरपालिका यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई न करता, कोल्हापूर येथील प्रदूषणास

जबाबदार असणा-या साखर कारखारे आणि आसवनी यांच्याविरुध्द देखील फौजदारी खटले दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच, संबंधीत कसूरदार कारखान्यांना योग्य ते आदेश देऊन त्यांच्याकडून बँकेची हमी घेऊन, कामकाज करुन घेण्यात आलेले आहे. ज्यांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारली नाही किंवा चालविली नाही अशा उद्योगधंद्यांची बँकेची हमीची रक्कम देखील जप्त करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कडक कायदेशीर कारवाईमुळे इचलकरंजी येथील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे काम जवळजवळ ९०% पूर्ण झालेले आहे, ज्या यंत्रणेमध्ये भुयारी गटार योजनेअंतर्गत ८०% उद्योग समाविष्ट झालेले आहेत. मप्रनि मंडळाने छ.प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयास सांडपाणी प्रक्रिया उभारण्यास ९०% आर्थिक अनुदान दिलेले असून, सदरहू यंत्रणा व्यवस्थितरित्या कार्यरत आहे. जैव वैद्यकीय घनकचरा(व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ नुसार मप्रनि मंडळाने सर्व संबंधीत जैव वैद्यकीय घनकचरा निर्माण करणा-या संस्थांना योग्य ती घनकचरा व्यवस्थापन करण्याबाबत कडक कायदेशीर कारवाया केलेल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी हे जल व हवा प्रदूषण कायद्यांतर्गत **लोकसेवक** असून, त्यांना पर्यावरण कायद्याअंतर्गत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे विशेष अधिकार केंद्रीय पर्यावरण कायद्यांतर्गत देण्यात आलेले आहेत. माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार पर्यावरण प्रदूषणाबाबत विशेष कायदयाअंतर्गत कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेले असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे पर्यावरण कायद्यांचे विनियमन करणारे विनियामक मंडळ आहे. अशा परिस्थितीमध्ये मप्रनि मंडळाच्या अहवालानुसार जिल्हादंडाधिकारी यांनी नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० नुसार कोल्हापूर महानगरपालिकेविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.

वास्तविक वरील अर्जामध्ये अर्जदार यांनी कोल्हापूर महानगरपालिका यांच्याविरुध्द योग्य तो अर्ज करणे गरजेचे होते आणि सदरहू अर्जामध्ये मप्रनि मंडळाने दिलेल्या अहवालानुसार कोल्हापूर महानगरपालिकेकडून, अंमलबजावणी प्राधिकरण म्हणून, जिल्हादंडाधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही अथवा कारवाई त्यांच्याविरुध्द करणे गरजेचे आहे. तसेच, यापूर्वी वरील कारणास्तव अर्जदार यांनी २००९ मध्ये केलेल्या अर्जावर, मप्रनि मंडळाने दिलेल्या उत्तरानुसार कोल्हापूर महानगरपालिका यांना पर्यावरण कायद्यांची पूर्तता करणेबाबत आदेश देण्यात आलेले होते. अशा परिस्थितीमध्ये त्याच कारणास्तव पुन्हा: वेगळा अर्ज करुन, मप्रनि मंडळासारख्या पर्यावरण कायद्यांची विनियमन करणा-या कायदेशीर प्राधिकरणाविरुध्द अर्जदाराने केलेला अर्ज निकाली काढणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र शासनाने प्रसारित केलेल्या **नद्यांच्या पाणी गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्याबाबतच्या दिनांक १३/७/२००९ च्या सुधारीत धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडे निर्माण होणा-या संपूर्ण घरगुती सांडपाण्यासाठी ३ वर्षांच्या आत, योग्य ती सांडपाणी संयंत्रणा उभारुन, कार्यान्वित करणे बंधनकारक आहे, याबाबतचा कालबध्द कार्यक्रम व पाठपुरावा नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत करावयाचा आहे.** अशा परिस्थितीमध्ये जिल्हादंडाधिकारी व नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० मधील तरतुदींनुसार अंमलबजावणी प्राधिकरण म्हणून, आपल्या कार्यालयामार्फत योग्य तो कालबध्द कार्यक्रम कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडून घेण्यात यावा व त्याबाबत योग्य तो पाठपुरावा करणे गरजेचे आहे. तसेच, कोल्हापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राबाहेर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद कोल्हापूर यांच्यावर नागरी घनकचरा व्यवस्थापन नियमांची पूर्तता करण्याची जबाबदारी असून, त्यांच्याकडून योग्य तो कालबध्द कार्यक्रम घेऊन, पाठपुरावा करणे, नद्यांची पाणी गुणवत्ता सुधारणा धोरणाच्या खंड-१२ प्रमाणे करणे गरजेचे आहे. सोबत सुधारीत नद्यांचे धोरण दिनांक १३/७/२००९ ची प्रत माहितीसाठी **जोडपत्र-इ** प्रमाणे जोडण्यात येत आहे.

कोल्हापूर शहर व कोल्हूपर शहराबाहेरील सांडपाणी याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे प्राधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ नुसार

देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे, मप्रनि मंडळाने सर्व कायदेशीर कारवाया केलेल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये मंडळ हे विशेष कायदेशीर अधिकार प्राप्त झालेले असल्यामुळे, पर्यावरण कायद्यानुसार, मंडळाच्या अहवालानुसार पुढील कारवाई होणे गरेजेचे आहे, असे माननीय उच्च न्यायालयाने, जिल्हान्यायदंडाधिका-याने पर्यावरण प्रदूषणाबाबत दिलेल्या कलम १३३, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील आदेशाबाबत स्पष्ट केलेले असून, याबाबत जिल्हान्यायदंडाधिकारी यांनी मप्रनि मंडळास आदेश देणे इष्ट होणार नाही. जी व्यक्ति किंवा संस्था प्रदूषण करते, अशा व्यक्ति किंवा संस्थेस पर्यावरण प्रदूषण नियंत्रीत करण्याबाबत योग्य ते आदेश देणे इष्ट होईल, मात्र, असे आदेश पर्यावरण कायद्यांचे विनियमन करणा-या मप्रनि मंडळास देणे योग्य होणार नाही.

| ( अजय देशपांडे ) | ( अमर दुर्गुले ) |
|---|---|
| प्रतिवादी क्र.१ तथा | प्रतिवादी क्र.२ तथा |
| प्रादेशिक अधिकारी-कोल्हापूर | उप-प्रादेशिक अधिकारी-कोल्हापूर |

स्थळ : कोल्हापूर
दिनांक १७/०२/२०११